जा.क्र.प्रशासन/प्रशासक/मानधन/२०११
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचे कार्यालय,
दिनांक 29 मार्च, २०११

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, (सर्व.)

विषय-सहकारी संस्थांवरील प्रशासकांना द्यावयाच्या मानधनाबाबत..

संदर्भ- १. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.१.प्रशासन/क.१८४/२अ/८८दिनांक २३/२७/१२/२००८

२.ना.बँका/डी-४/ना.सह.बँका/प्रशा/अवसा/मान/०७ दिनांक ३१/७/२००७

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१), ७७ अ तसेच कलम १६० अ अन्वये विविध प्रकारच्या सहकारी संस्थांवर प्रशासकिय मंडळ/प्रशासक यांच्या नेमणूका केल्या जातात. प्रशासकिय कामकाजाचा महनताना /परिश्रमिक बाबत संदर्भिय परिपत्रकान्वये सूचना दिल्या होत्या. तथापि, त्यानंतर बराच कालावधी होवून गेलेला असल्याने त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे. सबब, या परिपत्रकानुसार खालीलप्रमाणे संस्था प्रकारनिहाय द्यावयाचा कमाल मर्यादा निश्चित करण्यात येत आहे.

| वर्ग | उपवर्ग | संस्था प्रकार | मानधन दरमहा |
|---|---|---|---|
| १.कृषी संस्था | अ. पणन संस्था | सर्व खरेदी विक्री संस्था व कृषी पणन संस्था इ. | मूळ वेतनाच्या २५% |
| | ब. इतर कृषी संस्था | प्राथमिक दुग्ध व कुक्कुट पालन संस्था इ. | मूळ वेतनाच्या १५% |
| | | तालुका व जिल्हा दुध संघ | मूळ वेतनाच्या २०% |
| १ अ. पीक संरक्षण संस्था | | | मूळ वेतनाच्या २०% |
| १ ब. उपसा जलसिंचन | | उपसा जलसिंचन, पाणी पुरवठा सहकारी संस्था, पाणी वापर सहकारी संस्था | मूळ वेतनाच्या २०% |
| २. ग्राहक संस्था | | प्राथमिक ग्राहक संस्था | मूळ वेतनाच्या २५% |

F/Administration backup/Rekha/circular II

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. सहकारी बँका | अ. मध्यवर्ती बँका | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका | | मूळ वेतनाच्या ५०% |
| | ब. इतर बँका | नागरी सहकारी बँका<br>१. १ ते १०० कोटी ठेवी असलेल्या | | मूळ वेतनाच्या २५% |
| | | २. १०० कोटीवरील ठेवी असलेल्या | | मूळ वेतनाच्या ५०% |
| ३ अ. भुविकास बँका | | जिल्हा भुविकास बँका | | मूळ वेतनाच्या २५% |
| ४. फार्मिंग सहकारी संस्था | | | | मूळ वेतनाच्या २०% |
| ५. गृहनिर्माण सहकारी संस्था | भाडेकरू मालकी हक्क सहकारी गृह संस्था | | १ ते १०० सभासद असलेली गृह संस्था | मूळ वेतनाच्या १०% |
| | भाडेकरू सहभागीदार सहकारी गृह संस्था | | १०० पेक्षा जास्त सभासद असलेली गृह संस्था | मूळ वेतनाच्या २५% |
| | इतर सहकारी गृह संस्था सहकारी गृह संस्था | | २०० वरील सभासद संस्था | मूळ वेतनाच्या ३०% |
| ६. प्रक्रिया संस्था | कृषी प्रक्रिया संस्था | साखर कारखाने, तेल गिरण्या इ. | | मूळ वेतनाच्या ५०% |
| | औद्योगिक प्रक्रिया संस्था | सूत गिरण्या इ. | | मूळ वेतनाच्या ५०% |
| ७.उत्पादक संस्था | औद्योगिक उत्पादक सह. संस्था | विणकर सहकारी संस्था | | मूळ वेतनाच्या २०% |
| | कामगारांच्या औद्योगिक सह.संस्था | जंगल कामगार व मजूर सहकारी संस्था | | मूळ वेतनाच्या २०% |
| ८. साधन संस्था | पतपुरवठा साधन संस्था | विविध कार्यकारी सेवा संस्था | | मूळ वेतनाच्या २०% |
| | कामगारांच्या औद्योगिक सह. संस्था | पतपुरवठा (ग्रामिण व नागरी ) | | मूळ वेतनाच्या २०% |
| | | पगारदार सेवकांच्या सहकारी संस्था | १ कोटीपर्यंत खेळते भांडवल असणा-या संस्था | मूळ वेतनाच्या २०% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | १ कोटीवरील | मूळ वेतनाच्या ३०% |
| | बिगर पतपुरवठा साधन सहकारी संस्था | बी-बियाणे , कृषी अवजारे व कृषी | मूळ वेतनाच्या २५% | |
| | सेवा साधन संस्था | सेवा सहकारी संस्था व बहुउद्देशिय सहकारी संस्था | मूळ वेतनाच्या २०% | |
| सर्वसाधारण संस्था | | सर्व प्रकारच्या या वर्गिकरणातील सहकारी संस्था उदा - मोटार वाहतूक संस्था इ. | मूळ वेतनाच्या २५% | |

*मूळ वेतन म्हणजे बेसिक पे अधिक ग्रेड पे.

*प्रशासकीय मंडळ असेल तर प्रशासकीय मंडळाचे फक्त अध्यक्ष हे वरीलप्रमाणे मानधन घेण्यास पात्र असतील.

*जर अधिकारी / कर्मचारी एकावेळी एकापेक्षा अधिक सहकारी संस्थांवर प्रशासक म्हणुन कामकाज करत असेल तर फक्त एकाच संस्थेतून मानधन मिळणेस पात्र असेल.

* ज्या संस्थांच्या बाबतीत मानधन यापुर्वीच मंजूर झाले असेल त्यांचे बाबतीत या परिपत्रकाचे दिनांकापासून वरीलप्रमाणे मानधन घ्यावे. ज्याबाबतीत पूर्वी मानधन मंजूर झाले नसेल अशा ठिकाणी सुध्दा या दराने मानधन घ्यावे.

*या संदर्भातील यापुर्वीच्या परिपत्रकीय सूचना रद्द करण्यात येत आहेत.

(राजगोपाल देवरा)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

F/Administration backup/Rekha/circular II